**नि.दि.दावा क्र.७८/२०१० मधील नि.३६,३७ व ४० वरील एकत्रीत आदेश**

१. वादींनी प्रस्तुतचा दावा हा वाटणीव मनाईकरीता दाखल केलेला आहे. निशाणी ३६ वरील अर्ज हे मयत प्रतिवादी क्र.१ जगन्नाथ संभू तावसे याचे वारसांना अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होणेकरीता व निशाणी ४० वर वारसांची नोंद करणेस व अबेटमेंटचा आदेश रद्द ठरविणेकरीता (set aside ) दाखल केलेला आहे. निशाणी ३७ वरील अर्ज हा प्रतिवादी क्र.१ हे दि.२६/०४/२०१३ रोजी मयत झाले व त्यांचे वारस अभिलेखावर आणणेकरीता दुरुस्तीकरीता अर्ज दाखल केला. मयत प्रतिवादी क्र.१ याचे वारसांना नोटीसा काढण्यात आले होत्या व त्यांनी हजर होवून त्यांनी म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला.

२. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जात व म्हणण्यात नमूद मजकूराप्रमाणे युक्तीवाद केला. वर नमूद संपूर्ण बाबींचा व संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, प्रतिवादी क्र.१ हा दिनांक २६/०४/२०१३ रोजी मयत झाला आहे ही बाब न्यायालयाला अगर वादीला कोणत्याही प्रतिवादीनी कळविले नव्हते. तसेच वादीने प्रस्तुतचे अर्ज हे शपथेवर दाखल केलेले आहेत. त्याने शपथेवर कथन केले की, त्याने प्रतिवादी क्र.१ याचे वारस अभिलेखावर आणण्यास

विलंब झाला हा त्याला तो मयत झालेचे माहीत नसल्यामुळे झाला आहे. निशाणी ३८/१ वर मृत्यूचा दाखला दाखल आहे. निशाणी ३६, ३७ व ४० चे अर्ज हे सन २०१४ मध्ये दाखल केले आहे. परंतु, आजपर्यंत वादी किंवा प्रतिादीनी प्रस्तुतचे अर्जावर आदेश होवून दाव्याची प्रक्रिया पुढे चालविण्यासाठी प्रयत्न केले नाही. परंतु, संचिका पाहता प्रतिवादी क्र.१अ मयत झालेचे कळवून त्याचे वारसांना संचिकेवर आणले आहे. परंतु प्रतिवादी क्र.१ मयत झालेबाबतचे प्रस्तुतचे तिन्ही अर्ज हे प्रलंबित राहिले. तसेच प्रतिवादी क्र.१ चे वारसांना नोटीसची बजावणी होवून ते विधीज्ञ श्री. एम.एस. डोंबे यांचेमार्फत हजर झाले व त्यांनी निशाणी ४९ वर कैफियत दाखल केली. परंतु संचिकेवर प्रतिवादी क्र.१ चे वारसाना अभिलेखावर घेणेचा प्रस्तुतचे तिन्ही अर्ज सन २०१४ पासून प्रलंबित राहिले. प्रस्तुत दावा हा वाटणीचा असल्याने सर्व सहहिस्सेदारांना संचिकेवर आणणे गरजेचे आहे.

३.   सबब वरील सर्व बाबींचा विचार करता मी या निष्कर्षास आलो आहे की, वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब हा माफ करणे हे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने जरुरीचे आहे तसेच प्रतिवादी क्र.१ याचा हक्क उत्तरजीवी (survive) होत असल्याने झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करणे जरुरीचे आहे. प्रस्तुतचा दावा हा तुर्तातूर्त मनाई अर्जाचे चौकशीकामी प्रलंबित आहे. परंतु, प्रतिवादी

क्र.१ हा दिनांक २६/०४/२०१३ रोजी मयत झाला. भारतीय मुदत कायदा आर्टीकल १२० प्रमाणे मृत्यू तारखेपासून ९० दिवसांमध्ये मयताचे वारसांना संचिकेवर आणणे गरजेचे आहे तसेच आर्टीकल १२१ प्रमाणे अवसान पावल्याचे तारखेपासून ६० दिवसांत अवसान पावलेचे हुकूम रद्द होणेसाठी अर्ज देणे गरजेचे आहे. परंतु, प्रतिवादीचे वकीलांने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम १०अ प्रमाणे कर्तव्यायाचे पालन केले. परंतु, प्रतिवादी क्र.१ चे वारसांची नावे मुदतीत कळविले नाही. परंतु, मयताचे वारस हे नोटीसाची बजावणी झालेवर हजर झाले.

४.    वर नमूद बाबींचा व संपूर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, वादीने नि.३६, ३७ व ४० वरील अर्जातील मजकूर हा शपथपत्रावर कथन केलेला आहे. प्रस्तुतचे अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या अंतिम निकालावर निर्माण होणा–या उभयपक्षकारांतील वादप्रश्नांचे निरसन होण्यास मदत होईल. तसेच प्रस्तुत दाव्याचे हुकूमनाम्याची परिणामकारक बजावणी होण्याकरीता मयत प्रतिवादी क्र.१ याचे वारसांना अभिलेखावर सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ याचे हक्क हे उत्तरजीवी (survive) होत असल्याने त्याचे वारस अभिलेखावर येणे हे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने गरजेचे झालेले असून झालेला विलंब हा माफ करणे व अवसान पावलेचा आदेश रद्द करणे मला न्यायोचित वाटते. तसेच वादीने सुमारे आठ

महिने मयत प्रतिवादी क्रमांक १ याचे वारसांची माहिती घेण्यासाठी विलंब लावला . त्यामुळे दाव्याचे कामकाजास विलंब झाला. सदरचा अर्ज सन २०१४ पासून प्रलंबित आहे. वादीने दाव्याचे कामकाज लवकरात लवकर होण्यासाठी तत्परता दाखविली नाही. यामुळे त्याचेवर खर्चाची रक्कम लादणे मला न्यायोचित वाटते. सबब वरील सर्व बाबींचा विचार केला असता मला खालील आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते.

**आदेश**

१. वादीचे निशाणी ३६, ३७ व ४० वरील अर्ज हे खर्च र.रु.३००/- (रुपये तीनशे फक्त) वर मंजूर करण्यात येतात.

२. वादीने खर्चापोटी र.रु.३००/-(रुपये तीनशे फक्त) ही सरकार जमा करावी.

३. वादीने निशाणी ३६, ३७ व ४० प्रमाणे प्रतिवादी क्र.१ याचे वारसांना आजपासून १४ दिवसांचे आत अभिलेखावर आणावे व दाव्याची दुरुस्ती प्रत द्यावी.

४. संबंधित लिपिकाने या दुरुस्तीची नोंद या दाव्याचे रजिस्टरला करावी.

( न्यायासनावरुन खुल्या न्यायालयात घोषित केले. )

म्हसवड
दिनांक १८/०१/२०१९

(**गजेंद्र म. कोल्हापुरे**)
दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, म्हसवड

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. File order are same word to word, as per the original order.

Name of the Stenographer : D. C. Raut, Steno (L.G.)

Court Name : C.J.J.D. ,Mhaswad, Tal.Man, Dist. Satara

Order Date : 18/01/2019

Order signed by the Presiding Officer on : 18/01/2019

Order uploaded on: 18/01/2019